# अवतार मेहेरबाबांचा विश्वसंदेश

मी शिकविण्याकरिता नव्हे, जागृत करण्यासाठी आलो आहे. हे लक्षात ठेवा की कोणतेही विधिनियम मी घालून देत नाही.

अनादि कालापासून मी विधिनियम व सिध्दान्त प्रतिपादित आलो आहे पण मानवाने त्याची उपेक्षा केली आहे. ईश्वर वचनांचे पालन करण्यासंबधीची मानवा मधील असमर्थता अवताराची शिकवणूक एक थट्टेचा विषय बनविते. ईश्वरी पुरूषांनी घालुन दिलेल्या दयापूर्ण आचरणाच्या शिकवूणकी ऐवजी अवताराच्या नावावर मानवाने धर्मयुध्देच केली आहेत. अवतारांनी उपदेशिलेली नम्रता, पावित्र्य व सत्याचरण ही तत्वे, अमलांत आणण्याऐवजी व्देष, लोभ व हिंसा यांचीच मानव कांस धरीत आला आहे.

भूतकालांत ईश्वराने घालून दिलेले विधिनियम व सांगितलेले सिध्दांत यांची मानवाने उपेक्षा केली असल्याने सध्याच्या या अवतार रूपांत मी मौन धारण केले आहे. तुम्ही शब्दरूप उपदेशाची मागणी केलीत व मी तो तुंम्हाला भरपूर दिलाही आहे. आता त्यानुसार आचरण करण्याची वेळ आली आहे. ईश्वराच्या आधिकाधीक निकट येण्यासाठी तुम्हाला 'मी' 'मला' 'माझे' या पासून जास्तीत जास्त दूर गेले पाहिजे. यासाठी तुम्हाला तुमच्या मर्यादीत 'अहम्' व्यतिरिक्त अन्य कशाचाही त्याग करण्याची जरूरी नाही. हे इतके सहज साध्य वाटत असले तरी ते जवळजवळ अशक्यप्राय आहे असे आढळून आले आहे. तुम्हाला तुमच्या मर्यादित 'अहम्' चा त्याग करणे केवळ माझ्या कृपे मुळेच शक्य आहे व ती कृपावृष्टि करण्याकरता मी अवतरलो आहे.

मी पुन्हा सांगतो की मला कोणतेहि विधिनियम घालावयाचे नाहीत. सत्याचा अविष्कार करण्यासाठी मी आलो आहे. सत्य मजपासून प्रसृत होताच लोकांचे दैनंदिन जीवन हे सजीव विधिनियमांचे प्रात्यक्षिक बनेल. माझे अनुच्चारित शब्द लोकांच्या आचरणातून व्यक्त होतील. मानवातील अज्ञानरूपी पडद्याने मी स्वत:ला मानवापासून झाकून घेतो व माझे दिव्य ऐश्वर्य फारच थोडयांना प्रकट करतो. माझा हा अवतार चालू कालचक्रांतील अखेरचा आहे व म्हणूनच माझे यावेळचे प्रकटीकरण सर्वश्रेष्ठ राहील. मी जेव्हा मौन सोडीन त्यावेळी अखील विश्वाला माझ्या प्रेमाचा हादरा बसेल. सृष्टीतील प्रत्येक जीवमात्रास त्याच्या पात्रतेनुसार तो समजेल, त्याचा प्रत्यय येईल व त्याचा तो स्वीकार करील. प्रत्येकास स्वत:च्या बंधानातून आपआपल्या परीने मुक्त होण्यास त्या प्रेमाची मदत होईल. तुम्ही स्वत:वर जितके प्रेम करू शकता त्याहिपेक्षा तुमच्यावर अधिक प्रेम करणारा दैवी प्रियतम तो मीच आहे. माझे मौन सोडणे तुम्हाला तुमच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान होण्यास मदत करील.

जगात माजलेला हा सर्व गोंधळ व अव्यवस्था अटळ होती व त्याबद्दल कोणलाही दोष देता येत नाही. जे होणारच होते ते झाले आहे आणि जे घडणारे आहे, ते घडेलच. माझे तुमच्यामध्ये अवतरणे हाच त्यातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग होता व आहे. मला अवतार घेणे भाग होते म्हणून मी अवतरलो आहे. मीच तो सनातन पुरूष आहे.